# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६४/२००८/ दिनांक :

१) श्री. संतोष हत्तरकी,
(मे. रत्ना स्टोन क्रशर ), अर्जदार
गट नं. ३८६, चिप्री, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,
कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता(शहर),
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
विभागीय कार्यालय, जयसिंगपूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभागीय कार्यालय,

जयसिंगपूर

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :- १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

1 of 4
164 of 2008

श्री. संतोष हत्तरगी यांचे रत्ना स्टोन क्रशर यांनी ४० अश्वशक्ती भार असलेली औद्योगिक वीज जोडणी गट क्र. ३८६ चिपरी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे आहे. दरम्यान वि.प.कडून गावठाण व शेती करिता स्वतंत्र फिडर्सची व्यवस्था करण्यात येत आहे. त्यात अर्जदाराचे औद्योगिक जोडणी शेती फिडरवर जोडली आहे. शेती फिडरचे भार नियमन काल जादा असलेमुळे त्याचा उत्पादनावर परिणाम होत आहे. सदर जोडणी गावठाण फिडरवर द्यावी अशी मागणी आहे. या बाबत अर्जदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूरकडे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली. कक्षाने या बाबत आदेश क्र. ४५०४ दिनांक १६–४–२००८ ने निर्णय दिला आहे. सदर निर्णय मान्य नसलेमुळे तक्रारदार यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच. कोल्हापूर परिमंडळाकडे दिनांक १३–५–२००८ ला अपील दाखल केले. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरू केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून तक्रारीवर मुद्देनिहाय माहिती अहवाल मागविला व सुनावणी दिनांक १७–६–२००८ रोजी १२.०० वाजता जयसिंगपूर विभाग कार्यालयात ठेवण्यात आली.

सदर सुनावणीवेळी तक्रारदार, श्री. पी.व्ही. कांबळे, कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, कोल्हापूर, श्री. एस.एस. बंडगर, सहाय्यक अभियंता, जयसिंगपूर उप विभाग, श्री. एस.डी. कुराडे, सहाय्यक अभियंता, जयसिंगपूर उप विभाग इत्यादी हजर होते.

अर्जदाराने तक्रारीचे स्वरूप व म्हणणे खालील प्रमाणे मांडले. तक्रारदारांचे रत्ना स्टोन क्रशर नांवे

४० अश्वशक्ती खडी मशिन वीज जोडी क्र. २५२८२०००७६४५ चिप्री, ता. शिरोळ येथे आहे. वितरण कंपनीचे धोरणानुसार वीज वितरण व्यवस्थापनाकडून शेतीपंपा करिता व शेतीपंपावर जोडण्या करिता तेथे स्वतंत्र फिडर्स करणेत येत आहेत. अर्जदारांची जोडणी शेतीपंप फिडरवर घेतली आहे. अर्जदारांचे व्यवसायाचा कालावधी साधारणपणे सकाळच्यावेळी असतो व शेतीपंप फिडरला १४ तासांचे भार नियमन प्रति दिवस असते. त्यानुसार ८–९ तास वीज पुरवठा उपलब्ध असतो. सदर अर्जदाराचे स्टोन क्रशर पासून सुमारे ५० फुटावरून गावठाण फिडर जात आहे त्यावर जोडून मिळावे असे नमूद करणेत आले. तसेच डि.डि.एस. योजनेत १.३% रक्कम भरून स्वतंत्र रोहित्र उभारून गावठाण फिडरवर जोडणी जोडून घेणेस ग्राहकाने तयारी नसलेचे सांगितले. या बाबत वितरण कंपनीचे बाजूने सांगण्यात आले.

त्या परिसरात सुमारे ३२ स्टोन क्रशर्स जोडण्या आहेत.  वितरण कंपनी मुख्य कार्यालयाचे आदेशानुसार सध्या भार नियमन केले जात आहे.  त्यात औद्योगिक स्वतंत्र फिडर्सला भार नियमन लागू नाही.  त्यानुसार तेथील सर्व स्टोन क्रशर्सचे असोसिएशनने त्यांची सर्व कनेक्शन्स नवीन एक्स्प्रेस औद्योगिक फिडरवर ६.७ कि.मी. ११ केव्ही वाहिनी टाकून त्यावर घेणे करिता अर्ज प्रकरण दाखल केले.  सदर काम ते १.३% पर्यवेक्षक आकार भरून घेण्यास तयार होते.  सदर प्रकरण २६ एप्रिल २००७ ला मंजूर करण्यात आले.  त्यावेळी जयसिंगपूर उपकेंद्रातून सदर फिडर काढतांना उपकेंद्रातील बे चा खर्च (आयसोलेटर्स, सीटी, ब्रेकर यांचा संच) वितरण कंपनीने करण्याची तयारी दाखविली होती.  अर्जदारासमवेत स्टोन क्रशरचे असोसिएशनचा हे काम करून घेणेचा प्रयत्न असलेमुळे त्यांना गावठाण फिडरवर  जोडून घेतले नाही व गावठाण व शेतीपंपाचे फिडरवर स्वतंत्र करून त्यावर जोडण्या घेण्याचे पाहणी त्याप्रमाणे मंजुरी व निविदा इ. कामे पूर्ण झाली असल्याने अर्जदाराचे जोडणी आता गावठाण फिडरवर  जोडता येणार नाही.

2 of 4
164 of 2008

## ग्राहक सदस्यांचे मत खालील प्रमाणे

मे. रत्ना स्टोन क्रशर, मु. पो. चिप्री, ता. शिरोळ ह्या ग्राहकाचा वीज पुरवठा स्टोन क्रशरसाठीचा आहे. प्रामुख्याने सदरचे क्रशरचे काम सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत चालते.  सदरचा  व्यवसाय  दि.  १–११–१९७८ पासून आहे त्याच जागी चालू आहे.  त्यासाठी ४० एची.पी. इतका वीज पुरवठा आहे.  महाराष्ट्रात सर्वत्र वीज टंचाई असल्याने भार नियमन करावे लागत आहे, ही वस्तुस्थिती ग्राहकाला माहित आहे.  स्वतंत्र औद्योगिक फिडर उभा करून त्यातून वीज पुरवठा घ्यावयाचा म्हणून क्रशर असोसिएशने पुढाकार घेतला व तसे एस्टीमेट मंजूर करून घेतले.  तथापी भरावयास लागणाऱ्या रकमेची तरतूद न झाल्याने सदरची स्वतंत्र फिडरची योजना कागदावरच राहिली.  सदर योजनेत ३४ ग्राहकांचा समावेश होता.  पैकी तक्रारदार व त्यांच्या शेजारी आणखी एक ग्राहक असे एका दिशेला व राहिलेले उर्वरित ग्राहक दुसऱ्या दिशेला आहेत.  सदरचे एस्टीमेट मंजूर केल्यामुळे ' गावठाण ' फिडरवर सदर ग्राहकाला घेतले नाही असे कंपनीने नमूद केले आहे.  एस्टीमेट मंजूर होणे म्हणजे सदरची योजना कार्यान्वीत झाली असा काढेला अर्थ चुकीचा आहे. सदर ग्राहकाचे कनेक्शन सध्या अेजी (Ag.) फिडरवर असल्याने भार नियमनाचा जास्त फटका बसत आहे.  औद्योगिक दराने वीज बील भरूनही इतक्या जादा भार नियमनामुळे ग्राहकाचे आर्थिक नुकसान होत आहे.  ग्रामीण भागातील उद्योग व मंजूरांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. सदरच्या कनेक्शन पासून अवघ्या ५० फूटावरून ' गावठाण ' फिडर गेला आहे.  त्या फिडरवर माझा सप्लाय चालू करा अशी मागणी ग्राहकाची आहे.  पण तुमची नोंद आम्ही कळविली नाही असे कंपनीचे मत आहे. वस्तुस्थितीची पहाणी मंचाने कंपनीच्या पदाधिकारी समवेत ग्राहकाच्या समक्ष केली.  पर्यायी व्यवस्था व्हावी हा त्या मागील हेतू होता. सदरचा ग्राहक औद्योगिक दराने वीज बील भरणारा नियमित ग्राहक असल्याने तसेच भार नियमनाबद्दलची जाणीव असल्याने कंपनीने कमीत कमी खर्चात गावठाण फिडरवरून तक्रारदार ग्राहकास वीज पुरवठा द्यावा असे ग्राहक सदस्य म्हणून मी मत नोंदवित आहे.

भार नियमन हा कक्षाच्या अधिकारक्षेत्रात विषय येत नाही हे ग्राहक सदस्यास माहित आहे. तक्रारदार ग्राहकास भार नियमनाची जाणीव आहे. तसेच औद्योगिक दराने बील अदा करणारा नियमित ग्राहक असल्याने, तसेच त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप यांचा विचार करूनच निर्णय होणे आवश्यक आहे.

## सचिव व अध्यक्ष ग्रा.त.नि.मंच यांचे मत

वितरण कंपनीच्या सद्या अस्तित्वात असलेल्या शेतीपंप व गावठाण जोडण्या या त्या त्या वर्गवारीनुसार स्वतंत्र फिडर्स करून त्यावर जोडण्याचा सर्व्हे, प्रकरणाची मंजुराची घेणे, कंत्राटदाास निविदा देणे इ. कामे चालू असतांना अर्जदार व त्याचे इतर ३२ स्टोनक्रशरचा समावेश असलेल्या असोसिएशनने भार नियमन पूर्णपणे लागू राहू नये म्हणून औद्योगिक फिडर स्वतंत्रपणे डि.एस.एस. स्किममध्ये टाकून घेणेस प्रकरण दाखल करून त्या प्रयत्नात असलेमुळे वितरण कंपनीकडून सदर जोडण्या गावठाण फिडरवर जोडून घेणेच्या कामाचा सर्व्हेत समावेश केला नसावा व आता सर्व कार्यवाही उरकली गेल्यामुळे नव्याने जोडण्याचा बदल करणे शक्य नसलेचे दिसून येते. तसेच अर्जदार व त्यांचे असोसिएशनच मंजुरी दिलेल्या ६.७ कि.मी.च्या स्वतंत्र औद्योगिक फिडरचे काम करून घेणेस औत्सुक्य नाही. तसेच स्वत: अर्जदार गावठाण फिडरवर जोडणी जोडून घेणेचे कामास स्वतंत्र खर्चाने करणेस इच्छुक नाही.

दोन्ही बाजूंची कथने, सादर केलेली कागदपत्रें इ. विचारात घेवून मंच खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.



सदस्य सचिव व त्यांना असलेले मा. अध्यक्षांचे एक मत असा बहुमताने निर्णय केला आहे तो खालील प्रमाणे आहे.

## आदेश

१) अर्जदाराने दाखल केलेला विषय मंचाचे अखत्यारीत येत नसलेमुळे भार नियमन व गावठाण फिडर धोरणात्मक विषय असलेमुळे सदर तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णया विरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना या आदेशाचे दिनांकापासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई – ४०० ०५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

(एस.आर.बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर